दै.बीड
www.beedsuperfast.com
# सुपरफास्ट
• संपादक : अतुल शंकरराव जाधव •
• beedsuperfastgmail.com •



बीड नगर परिषद पाणीपुरवठा विभागांमध्ये गेल्या २० वर्षापासून प्लंबिंग चे काम करणारा मयत कर्मचारी हर्षद तुळशीराम शिंदे वय ३७ वर्ष राहणार धानोरा रोड हाउसिंग कॉलनी, बीड हा कुटुंबाचा आधार होता त्याच्या पाठीमागे पत्नी, लहान मुले, आई-वडील यांचा असा परिवार आहे त्याच्या कमाईवर घर चालत होते कुटुंबाचा अचानक कमवत्या मुलाचे निधन झाल्यामुळे आज त्याच्या कुटुंबाची परिस्थिती एकदम हलाखीची निर्माण झाली आहे. त्यामुळे संपूर्ण कुटुंबीय भविष्याच्या विचाराने चिंतेत असल्यामुळे आम्ही आज मा.मुख्याधिकारी फडसे सर यांना निवेदन देऊन मयत कर्मचारी हर्षद तुळशीराम शिंदे यांच्या पत्नीस बीड नगर परिषद प्रशासनामध्ये ( कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर ) नोकरी देऊन शिंदे कुटुंबीयांना न्याय देण्यात यावा . अशा प्रकारची प्रा.सनी वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने भेट घेऊन मागणी केली.

▪ बीड (महाराष्ट्र) ▪ वर्ष ४ ▪ अंक १५ ▪ गुरुवार दि. १५ जानेवारी, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2023/84694 ▪ पाने ४ ▪ किंमत ४ रु.
▪ BEED (Maharashtra) ▪ Year-4 ▪ Issue-15 ▪ Thursday 15 January, 2026 ▪ RNI : MAHMAR/2023/84694 ▪ Pages 4 ▪ Price 4

# केंद्राच्या योजनांचा बजरंग बप्पांनी घेतला आढावा; जिल्ह्याच्या विकासाला देणार दिशा



## केंद्राच्या योजना राबविताना समन्वय महत्वाचा : खा.बजरंग सोनवणे

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या योजना जिल्ह्यात राबवताना सर्व यंत्रणांनी समन्वय राखणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन खासदार बजरंग सोनवणे यांनी जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) सभेत केले.जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात समितीची सभा खासदार सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांनी केंद्राच्या विकास निधीतून जिल्ह्यात सुरू असलेल्या विकास कामांचा आढावा घेत यंत्रणेला सूचना केल्या यामुळे जिल्ह्याच्या विकासाला दिशा देणारी ही बैठक ठरली आहे. या बैठकीत समितीचे सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक संगीता पाटील, समिती चे सदस्य मोहन जगताप, अंजली आखाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हापरिषद अंतर्गत पंतप्रधान आवास योजनेचे विक्रमी उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल त्यांनी यंत्रणेचे यावेळी अभिनंदन केले. यात पुढील काळासाठी वाढीव उद्दिष्ट जिल्ह्यास प्राप्त झाले आहे याबाबत योग्य ते नियोजन करण्याची सूचना त्यांनी यावेळी दिली. जी कामे २०१६ पासून प्रलंबित दिसत आहेत आणि ती विविध कारणांमुळे होणे शक्यच नाही ती कामे वगळा अशीही सूचना त्यांनी दिली. अंगणवाडी विकासासाठी ग्रामीण विकास आणि जिल्हा नियोजन निधी यातून सध्या ३७५ कामे हाती घेण्यात आली आहेत. ही कामे घेताना ज्या अंगणवाड्यांचे काम अत्यावश्यक आहे त्यांना प्राधान्य देण्यात यावे असे खासदार सोनवणे म्हणाले. स्वच्छता कार्यक्रमांतर्गत वैयक्तिक शौचालय कामासाठी १२००० रुपये प्रोत्साहन निधी दिला जातो. यात गेल्या १० वर्षात वाढ झालेली नाही याकडे लक्ष द्यावे, जिल्ह्यातील ७७९२ शेतकऱ्यांनी बोगस सातबारावर पीक विमा उचलला त्यांच्यावर कारवाई होणार अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. तसेच कुसुम योजनेची माहिती घेत या कामाला गती देण्याच्या सूचना केल्या आहेत. केंद्र सरकारच्या लखपती दिदी योजनेअंतर्गत ८८,२१५ इतके उद्दिष्ट प्राप्त झाले आहे, यात उद्दिष्टापलीकडे जात ८८७१७ प्रकरणे पूर्ण झाले आहेत. वैयक्तिक शौचालय अंतर्गत ४६०० तर सार्वजनिक शौचालय अंतर्गत ३५५ कामे जिल्ह्यात प्रस्तावित आहेत. रोजगार हमी योजनेचा आढावा घेत यात दुहेरी देयकांची चौकशी करण्याच्या सूचना केल्या आहेत. सर्व बाजुंनी आढाव घेतला ही सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. ही दिशा बैठक जिल्ह्याच्या विकासाला दिशा देणारी ठरली असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

## राष्ट्रीय थाइबॉक्सिंग चॅम्पियनशिप, आरजीएफ टीम ने पटकावले १३ मेडल

**नांदेड । प्रतिनिधी**

लोकमत प्रायोजित नांदेड इनडोअर स्टेडियम येथे महाराष्ट्र राज्य थायबॉक्सिंग असोसिएशन चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत टीम आरजीएफ चे १३ फायटर्सनी बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. मुख्य प्रशिक्षक मोहम्मद रबी शेख आणि वरिष्ठ प्रशिक्षक मोहसीन सर यांच्या कठोर प्रशिक्षणाखाली. टीम आरजीएफमधील सर्वोत्तम फायटर्सपैकी एक आदिल तैमूर शेख यन्नी ८४ किलो हेवीवेट प्रकारात नॉकआउट विजय मिळवला आणि पीआरओ फाईटमध्ये हेड कोच मोहम्मद रबी शेखने स्प्लिट डिसिजनने टायटल बेल्ट जिंकला आणि २१,१९,१७,१४ वर्षांखालील गटात दुसऱ्या फायटरने सुवर्णपदके आणि ट्रॉफी जिंकल्या. १)अबरार खान २) शेख आमेर ३) वलीद काझी ४) ओमर सिराज पठाण ५) मोआज बसद६) शिवराज कुरुंद ७) रितेश ८) इंशरा खान ९) तोहीद १०) रिहान पठाण ११) शेख कामरान बीड जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य चॅम्पियन्सना त्यांच्या कठोर परिश्रम आणि कामगिरीबद्दल हे चांगला यश मिळाला आहे. आर जी एफ बीड चे रबी आणि मोहसीन सरांनी सर्व पदक धारकांना शुभेच्छा व्यक्त केली.




## नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांच्या पथकाचा वाळूमाफियानी घेतला धसका

**बीड । प्रतिनिधी**

आज दिनांक १३ जानेवारी रोजी सकाळी ०९ वाजता गोपनीय माहिती मिळाल्यावरून प्रशांत जाधवर नायब तहसीलदार महसूल व सोबत अंगद काशीद मंडळ अधिकारी पेंडगाव व विकास ससाने ग्राम महसूल अधिकारी पेंडगाव व इतर यांनी अवैध गौण खनिज रोखणे कमी गस्त घालत असताना उमरद जांधिर फाटा तालुका, जिल्हा बीड येथे त्यांना एक विना नंबरचा हायवा सिरस पारगाव कडून बीड च्या दिशेने वाळू वाहतूक करताना दिसून आला.

सदरच्या हायवाची तपासणी केली असता त्यामध्ये अंदाजे पाच ब्रास वाळू आढळून आली. चालक नामे हरकिसंन हरणाळ राहणार नांदूर हवेली तालुका जिल्हा बीड यास गौण खनिज परवाना बाबत विचारणा केली

असता असा कोणताही परवाना नसल्याचे समजले. सदरची वाळू ही गेवराई तालुक्यातील म्हाळसपिंपळगाव येथून भरून आणल्याचे त्यांनी सांगितले. सदरचा विना नंबरचा हायवा हा अवैध वाळू वाहतूक करताना आढळून » पान २ वर

### एक हायवासह एक ट्रॅक्टर जप्त



## धनादेश न वटल्याप्रकरणी आरोपीस सहा लाख रु.दंड व सहा महिनेकारावासाची शिक्षा





### ॲड. विष्णुपंत काळे, ॲड.बी. व्ही. वाघमोडे

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील ७ वे अतिरिक्त मुख्यदंडाधिकारी साहेब यांनी आरोपीस कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रमेंन्ट ॲक्ट अन्वये महत्त्वपूर्ण निकाल देऊन तब्बल सहा लाख रुपये रक्कमेचा दंड करून सहा महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे.सदर घटनेची हकीकत अशी की, मौजे नादुर हवेली येथील आरोपी नामे कडाजी ग्यानबा हुंबरे यांनी फिर्यादी ज्ञानेश्वर वैजिनाथ वाघमोडे रा.तांदळवाडी हवेली यांच्याकडून नवीन ट्रॅक्टर खरेदी करण्याकरिता व घरगुती अडचणी निवारण्या करिता फिर्यादी ज्ञानेश्वर कडे रक्कम रुपये ५,५०,००० रुपयांची आवश्यकता असल्याने मागणी केल्याने फिर्यादीने आरोपी कडाजी ग्यानबा हुंबरे याची मागणी मित्रत्वाचे संबंधा मुळे मान्य करून हात उसनवार रक्कम दिनांक ०७/०८/२०२४ रोजी आरोपी कडाजीस दिली. त्यानंतर सदरची » पान २ वर

## सौ.सुनंदा जगताप यांचे दु:खद निधन

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मुर्शदपूर येथील मूळ रहिवासी व सध्या शिवाजी विद्यालया जवळील त्वरिता कॉलनी येथे



वास्तव्यास असलेल्या सौ. सुनंदा राजेंद्र जगताप (वय ६८) यांचे आज पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दु:खद निधन झाले. त्या श्री राजेंद्र संतराम जगताप यांच्या पत्नी तसेच श्री प्रवीण राजेंद्र जगताप यांच्या मातोश्री होत्या. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच त्वरिता देवी कॉलनी व मुर्शदपूर परिसरात शोककळा पसरली. सौ. सुनंदा » पान २ वर

## धारदार कोयत्यासह सराईत गुन्हेगार अटकेत

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर पोलिसांच्या वेळेवर आणि सतर्क कारवाईमुळे शहरात होऊ शकणारा मोठा अनर्थ टळल्याची घटना ११ जानेवारी २०२६ रोजी घडली. बीड शहर पोलीस ठाणे हद्दीतील माळी वेस चौक परिसरात संशयास्पदरीत्या उभी असलेली स्कार्पिओ गाडी तपासणीदरम्यान धारदार, घातक कोयता आढळून आल्याने एक सराईत गुन्हेगार पोलिसांच्या ताब्यात आला आहे. दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी रात्री पोलीस उपनिरीक्षक संदीप नेवरे हे त्यांच्यासोबत पोलीस अंमलदार इलियास शेख, अफसर बागवान व चालक फिरोज पठाण यांच्यासह रात्रगस्त घालत असताना माळी वेस चौक येथे रात्री ११ वाजण्याच्या सुमार पांढऱ्या रंगाची स्कार्पिओ (क्रमांक एम.एच. १७ बीई ५००७) संशयास्पद अवस्थेत उभी असलेली दिसून आली. पोलिसांनी गाडीत बसलेल्या इसमाची चौकशी केली असता त्याने आपले नाव संजय पांडुरंग बहिर (वय २७, रा. नवघन राजुरी, ता. व जि. बीड) असे सांगितले. मात्र तो त्या ठिकाणी का थांबला होता याबाबत समाधानकारक उत्तरे न देता उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने पोलिसांचा संशय बळावला. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक संदीप नेवरे व पोलीस अंमलदार इलियास शेख, अफसर

बागवान यांनी गाडीची सखोल तपासणी केली असता, स्कार्पिओच्या » पान २ वर





## सोयाबीन, कापूस भाववाढ; शेतकरी हक्क मोर्चाच्या मागणीला यश : राजेंद्र आमटे

### हा शेतकरी व शेतकरी पुत्रांच्या एकजुटीचा विजय

**बीड । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या सोयाबीन व कापूस पिकाला रास्त भाव मिळावा, या मागणीसाठी शेतकरी पुत्र शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाला यश मिळाल्याने सोयाबीन व कापसाच्या दरात वाढ झाली असून, हा विजय शेतकरी, शेतकरी पुत्र व शेती मित्रांच्या एकजुटीचा असल्याचे प्रतिपादन शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे यांनी केले. बीड येथील संत तुकाराम महाराज यांच्या पुण्यभूमी पारगाव जप्ती येथून सुरू झालेला कापूस व सोयाबीन भाववाढ आंदोलन मिडीयाचा माध्यमातून महाराष्ट्राच्या विधिमंडळात व थेट शेतकऱ्यांना भाववाढ करण्यापर्यंत पोहचली आहे कापूस व सोयाबीन दरवाढीसाठी बीड जिल्ह्यातील सुमारे ७० ते ८० गावांमध्ये शेतकरी, शेतकरी पुत्र व शेती मित्र यांच्या बैठका घेण्यात आल्या. या बैठकीत व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थिक




शोषणाची माहिती शेतकऱ्यांसमोर मांडण्यात आली. एक क्विंटल कापसापासून ७०० ते ८०० मीटर कापड, ५० किलो सरकी पेंड तसेच ८ ते १० लिटर तेल तयार होते. या सर्व उत्पादनांतून व्यापारी एका » पान २ वर

## मदरसा-तुल-फलाह पीपला येथे इज़हार-ए-तशक्कुर कार्यक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

पीपला येथील दारुल यतीमी मदरसा-तुल-फलाह येथे रविवारी (दि. १० जानेवारी २०२६) इज़हार-ए-तशक्कुर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी हाफ़िज़ हाजी लईक़ अहमद साहेब यांची विशेष उपस्थिती लाभली होती. यावेळी जेद्दा (सौदी अरेबिया) येथे झालेल्या मुसाबक़ा-ए-कुरआनमध्ये मदरसा रियाज़ुल उलूम, अनवा येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत क्रमांक प्राप्त केल्याबद्दल हाफ़िज़ हाजी लईक़ अहमद साहेब यांनी विद्यार्थ्यांची विशेष कौतुक करून प्रोत्साहित केले . त्यांनी या यशस्वी विद्यार्थ्यांना मौल्यवान इनामे देऊन सन्मानित केले. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी हिफ़्ज़



पूर्ण केले, त्या विद्यार्थ्यांना तसेच त्यांचे हिफ़्ज़चे असातिज़ा (शिक्षक) यांनाही प्रोत्साहनपर बक्षीस देऊन गौरविण्यात आले. याच कार्यक्रमात एका विद्यार्थ्याने अवघ्या सहा महिन्यांत २० पारे मुकम्मल केल्याबद्दल त्यालाही विशेष बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमप्रसंगी मदरशाचे नाझिम साहेब यांची सत्कार करून त्यांचे विशेष आभार मानण्यात आले. उपस्थितांनी हाफ़िज़ हाजी लईक़ अहमद साहेब यांच्या दीर्घायुष्य, आरोग्य, मालमत्ता, इज्जत व प्रतिष्ठेत वाढ होण्यासाठी दुआ केली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची प्रेरणा निर्माण झाली असून मदरशाच्या शैक्षणिक कार्याला नवी दिशा मिळाली आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल नाझिम मदरसा व सर्व असातिज़ा-ए-कराम यांनी समाधान व्यक्त केले.

# राजनीतीपेक्षा प्रभावी व्हावी लोकनीती!

राजकारण अत्यंत खालच्या पातळीवर उतरवण्याची ऑलिंपिक स्पर्धा लागल्याप्रमाणे, राज्यातील सत्ताधारी नेते-कार्यकर्ते वागत आहेत. केंद्रात आणि राज्यात येनकेनप्रकारेन सत्ता ताब्यात ठेवणाऱ्या भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, 'लातूरमधून विलासरावांचे नामोनिशाण मिटा देंगे', अशी मुक्ताफळं उधळतात. पुण्यामध्ये भाजपने केलेल्या अमाप भ्रष्टाचाराचे पाढे, त्यांच्या मांडीला मांडी लावून मंत्रिमंडळात सहभागी असलेले त्यांचे सत्तेतील भागीदार उपमुख्यमंत्री पुराव्यानिशी मांडतात. त्यांना पत्रकारांनी भ्रष्टाचाराबद्दल काही विचारले तर म्हणतात, 'माझ्यावर सत्तर हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप करणाऱ्यांसोबत मी सत्तेत आहे'! राज्य मंत्रिमंडळात सामील असणारे नवी मुंबईतील भाजपचे एक वरिष्ठ नेते, मंत्रिमंडळातील त्यांचे वरिष्ठ असणाऱ्या दुसऱ्या उपमुख्यमंत्र्यांबाबत, 'त्यांनी माझ्या नादाला लागू नये. त्यांचाही टांगा उलटा करून टाकेन, त्यांचे घोडे फरारच नव्हे तर गायब करून टाकेन!' असे म्हणतात. राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री या साऱ्याला नुसते अपवादच ठरणार नाहीत तर राजकारणातील या चुकीच्या बाबींना आळा घालतील, ही अपेक्षाही व्यर्थ! मुघलांच्या सरदारांना जसे जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी छत्रपती राजाराम महाराजांचे सरदार संताजी-धनाजी दिसत असत, तसे यांना सर्वत्र ठाकरे बंधू दिसत आहेत. उद्धव आणि राज ठाकरे म्हातारे झालेत, अशी भाषा ते वापरतात. 'या बोटावरची थुंकी त्या बोटावर', ही स्पर्धाही सत्ताधाऱ्यांनी त्यांच्या ऑलिंपिकमध्ये सुरू केली आहे. हे करताना केंद्र आणि राज्यस्तरावरील आपलेच जोडीदार पक्ष कसे गाळात निघतील, याची पद्धतशीर तजवीज सुरू आहे. 'मीच मोठा भाऊ', अशी चढाओढ करणाऱ्या भाजपला या स्पर्धेत हरवणं इतरांना अवघड जातं. दहा नेत्यांनी, अकरा तोंडाने, बारा बेताल विधानं, तेरावेळा करायची; ही भाजपची नेहमीची खासियत आहे. उलटसुलट डायलॉगबाजी करायची आणि जे विधान फारच लोकक्षोभाला बळी पडेल ते मग निमूटपणे मागे घ्यायचं आणि वर आम्ही असं बोललोच नव्हतो, अशा थापा मारत पुढची संधीसाधू विधानं करीत सुटायचं, याचे भक्कम प्रशिक्षण भाजप नेत्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघात पुरेपूर देण्यात आलं आहे. विदर्भात आपल्या सहकारी शिंदेसेनेला स्थानिक स्वराज्य संस्थेत सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी भाजपने ज्या एमआयएम पक्षाच्या नावे बोटं मोडण्यात उभं आयुष्य घालवलं त्याच्यासोबतच युती जाहीर केली. अंबरनाथमध्ये सहयोगी शिंदेसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी, भाजपने चक्क काँग्रेससोबत युती करायचं ठरवलं. भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाला याबाबत प्रश्न करताच, हे स्थानिक स्तरावरील निर्णय चुकीचे असल्याचे सांगत त्यांच्यावर कारवाई करू, असं सांगितलं. काँग्रेसने या पक्षविरोधी कृत्याबद्दल आपल्या १२ नगरसेवकांची लागलीच हकालपट्टी केली. भाजपने मात्र आपल्या पक्षातील स्थानिक नेत्यांवर कारवाई तर केली नाहीच उलट काँग्रेसने पक्षातून बाहेर काढलेल्या १२ जणांना भाजपमध्ये प्रवेश दिला! 'सत्तेसाठी काहीपण' ही एक नवीन ऑलिंपिक स्पर्धा भाजपने देशात सध्या सुरू केली असल्याने, त्याचा खेळ ते महाराष्ट्रातही करून दाखवत आहेत! या सर्वांवर कडी म्हणजे कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेत भाजपने स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्त केलेले तुषार आपटे यांचे निमूट राजीनामा प्रकरण! या आपटेंचा कारनामा जनता विसरून गेली अशा भ्रमात भाजप पक्षनेते होते! देशभर 'बेटी बचाओ' म्हणून जाहिरातबाजी करणाऱ्या पंतप्रधानांच्याच भाजपने, स्वीकृती दिलेले हे तुषार आपटे म्हणजे काही महिन्यांपूर्वीच बदलापुरात एका शाळेत लहान विद्यार्थिनीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणातील सहआरोपी! राष्ट्रवादी काँग्रेसच्या मदतीने सत्तेवर येताच मागल्या शुक्रवारी झालेल्या नगरपरिषदेच्या विशेष सभेत नेमणूक झालेल्या स्वीकृत सदस्यांमध्ये भाजपने या आपटेंचा समावेश केला होता. जागरूक नागरिकांनी याबाबत आवाज उठवताच, दुसऱ्याच दिवशी या बेटीविरोधी बदमाशाला राजीनामा देण्याचे फर्मान भाजपला सोडावं लागलं! जनता गाफिल राहिली असती तर हा नराधम नगरपरिषदेत भाजपच्या कृपाप्रसादे निर्विघ्नपणे ५ वर्षांची मुदत पूर्ण करू शकला असता. जनतेची जागरूकता, हाच लोकशाहीतील लोकनीतीचा पाया आहे. जनआंदोलनाचा राष्ट्रीय समन्वयाशी संलग्न घर बचाओ घर बनाओ आंदोलनाने, ज्येष्ठ सामाजिक नेत्या मेधा पाटकर यांच्या संयोजनात मुंबईत विविध पक्षाचे उमेदवार, आमदार आणि नेत्यांना लोकमंचावर बोलावून, जनतेच्या अपेक्षा विदित केल्या आणि त्यावर प्रत्येकाने आपापली भूमिका मांडावी असं सांगण्यात आलं. निवडून येणाऱ्या नेत्यांनी नंतर वचनभंग करण्याचा प्रयत्न केल्यास, जनता गप्प राहणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला. पुण्यात स्त्रीमुक्ती आंदोलन संपर्क समितीने घोषित केलेल्या जाहीरनाम्यात आवाहन केले, 'लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येण्यामागची प्रेरणा ही जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी; प्रस्थापित जनविरोधी धोरणे बदलण्यासाठी; नैसर्गिक, आर्थिक आणि मानवी संसाधनांचा अधिक चांगला विनिमय करण्यासाठी असायला हवी. परंतु ती फक्त स्वतःच्या 'विकासा'साठी आणि आपल्या बाजूने सत्ता वळवण्यासाठी आहे असे दिसून येते. त्यासाठी प्रतिस्पर्धी उमेदवारांना रोखण्यापासून अर्ज मागे घ्यायला लावण्यापर्यंत सत्ताबळ, धनशक्ती आणि मनगटशक्तीचा सर्रास वापर होत आहे. निवडणुकीच्या तोंडावरही सामान्य लोकांच्या, स्त्रियांच्या, कष्टकरी वर्गाच्या नागरी गरजा व प्राथमिकता काय आहेत हे समजून घेण्याची बहुतांशी उमेदवारांना गरज वाटत नाही. अशी निवडणूक प्रक्रिया म्हणजे निव्वळ थट्टा असून नागरिकांच्या संविधानिक मताधिकाराचे अवमूल्यन आहे. या आधीही निवडणुकीत अपप्रकार व्हायचे, पण संपूर्ण निवडणूकच आता अपप्रकारांची मालिका बनल्याचे आपण पहात आहोत. तत्त्वशून्य राजकारणाचा हा अभूतपूर्व गोंधळ भारतीय जनता पक्षाच्या दशकभराच्या कारकीर्दीत अधिकच वाढला आहे. किंबहुना हेतुपुरस्सर वाढवला गेला असे आमचे स्पष्ट मत आहे. स्वच्छ निवडणूक प्रक्रिया डावलत लोकांवर लादलेले लोकप्रतिनिधी आम्हाला नको आहेत. लोकशाही प्रक्रियेतून जनमताने निवडून आलेले आणि लोकांप्रति उत्तरदायित्व असलेले लोकप्रतिनिधी हवेत. शहरातील पाणी, वाहतूक व्यवस्था, शिक्षण, आरोग्य, कचरा व्यवस्थापन, या नागरी सुविधांमध्ये आणि रोज ढासळत चाललेल्या पर्यावरणासाठी आवश्यक सुधारणा तसेच ज्यांच्या श्रमाने शहर चालते त्या श्रमिक स्त्रियांच्या प्राथमिकतांकडे लक्ष देण्याचा भरोसा वाटणाऱ्या उमेदवारांनाच निवडून द्यावे! सर्व आयुष्य आंबेडकरवादी पुरोगामी चळवळीत घालवल्यावर आपली निस्पृह पत्रकारिता सोडून, सत्ताधारी शिवसेनेत गेलेल्या कार्यकर्ता- नेत्याने म्हटल्याप्रमाणे मतदान करा! तुम्ही गुंड असा, माफिया असा, बलात्कारी असा, ठेकेदार असा, बिल्डर असा, आम्हाला काही देणेघेणे नाही. आम्हाला पैसे द्या, नाही तर पिकनिकला घेऊन जा, तीर्थयात्रेला घेऊन जा, नाही तर टीव्ही, कुकर, साडी द्या. आमचं मत तुम्हाला! निवडणुकीत असं मत विकून झाल्यावर हेच मतदार, महापालिकेत किती भ्रष्टाचार आहे ना पाणी येत नाही म्हणून मोर्चा काढणार, रस्ते नीट नाहीत म्हणून बोंब मारणार, आक्रोश करणार, व्हॉट्सप आणि फेसबुकवर अक्कल पाजळणार आणि देश अमेरिका, जपान, जर्मनीसारखा झाला पाहिजे, अशी अपेक्षा करणार? 'बोये बीज बबूल के, तो आम कहा से आये'! मतदान विकणे म्हणजे सावकाराच्या घरी आपले बैल पाठवण्यासारखे आहे. देशाच्या नकाशावरील आपला सातबारा, पाच वर्षांसाठी विकणे आहे. शिक्षित, गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या, समाजसेवेचा अनुभव असणाऱ्या चारित्र्यसंपन्न उमेदवारांना मतदान करा! आपण मतदान केल्याचा अभिमान वाटला पाहिजे आणि पश्चात्तापही होता कामा नये. राजनीतीवर लक्ष ठेवून असणारी, राजनीतीपेक्षा प्रभावी लोकनीती उभारणारी जागरूक जनता, हीच लोकशाहीत खरी ताकद आहे. आगामी महापालिका निवडणुकीत सर्वांनी हे भान ठेवत, सत्ताधारी पक्षाला घरी बसवणारे मतदान करणे आवश्यक आहे!

# शिक्षणातून सु-संस्कृत समाज निर्मिती झाली पाहीजे -ह.भ.प. संभाजी महाराज

## महाराष्ट्र राज्य हे समतावादी विचारांचे राज्य म्हणून ओळखले जाते - रमेश पोकळे

**बीड | प्रतिनिधी**

शिक्षणातून सुस्कृंत समाजाची निर्मिती झाली तरच संपूर्ण राष्ट्राचा विकास साध्य होवू शकतो आणि राष्ट्राच्या विकासाला शिव,शाहू,फुले आंबेडकर यांचे समातावादी विचारांने चालना मिळू शकते असे विचार ह.भ.प. संभाजी महाराज( श्रीक्षेत्र नारायणगड संस्थान) यांनी व्यक्त केले तर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली त्यातच महाराष्ट्राची पायाभरणी होती म्हणूनच महाराष्ट्र हे समतावादी विचाराचे राज्य म्हणून ओळखले जाते असे विचार कै. अण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष मा श्री रमेशभाऊ पोकळे यांनी व्यक्त केले. येथील वसंतराव काळे पत्रकारिता आणि संगणकशास्त्र महाविद्यालय तसेच संभाजीराजे ग्रंथालय आणि



व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय,बीडच्या वतीने आयोजित राजमाता जिजाऊ माँ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यकमात ह.भ.प. संभाजी महाराज हे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. तर कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थाध्यक्ष रमेश पोकळे हे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर नारायण बहिर,हानुमान मुळीक, रवि शिंदे, सचिव प्रा. गणेश पोकळे,प्रा. बप्पासाहेब हावळे, प्र प्राचार्य आर डी सय्यद यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ माँ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. पुढे बोलताना ह.भ.प. संभाजी महाराज म्हणाले की, पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक हित जोपासण्यासाठी सत्यनिष्ठा आणि प्रामाणिकपणा जोपासला तरच पत्रकारितेच्या अंतीम ध्येयापर्यंत पोहचता येते. असे सांगून जगातील कोणताही धर्म हा इतर कोणत्याही धर्माला कमी लेखत नसतो, मोठे कार्य करणाऱ्या व्यक्ती नेहमीच वैश्विक कल्याणाचा विचार प्रदान करतात असे विचार व्यक्त केले. मा श्री रमेशभाऊ पोकळे यांनी,महापुरुषांच्या विचाराने,आचाराने विद्यार्थी घडला पाहिजेत तरच नैतिक अधिष्ठानावर आधारीत समाजनिर्मिती होवून भौतिक प्रगतीबरोबरच नैतिक समाज निर्माण होवू शकतो असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशासकीय अधिकारी प्रा. बप्पासाहेब हावळे यांनी केले. तर सुत्रसंचालन प्रा. शिवशंकर पटवारी यांनी केले. शेवटी कार्यक्रमाचे आभार संस्था सचिव प्रा. गणेश पोकळे यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा. कोमल सुरवसे,प्रा. सुहास गाढवे, प्रा. महेश नेवडे, प्रा. अतुल रसाळ, प्रा. अफरोज सय्यद, सौ. संध्या पोकळे, शंकर इंगोले, सचिन चौरे शिक्षकेत्तर कर्मचारी ,विद्यार्थी,विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**येळंब घाट - बीड जिल्ह्यातील येळंब घाट येथील बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आज १२ जानेवारी २०२६ रोजी स्वराज्य प्रेरिका राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ आणि युवकांचे स्फूर्तिस्थान स्वामी विवेकानंद यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली. मान्यवरांची उपस्थिती आणि प्रतिमा पूजन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री. मातकर बी. डी. हे होते. प्रमुख अतिथी म्हणून विद्यालयाचे नवनिर्वाचित उपमुख्याध्यापक श्री. चौरे व्ही. एस.पर्यवेक्षक श्री. कदम बी. एस. आणि ज्येष्ठ प्राध्यापक श्री. सोंडगे बी. बी. यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सांगता सामूहिक जिजाऊ वंदना गाऊन करण्यात आली.**

पान १ आणि ४ वरुन...

पान १ आणि ४ वरुन...

### धारदार कोयत्यासह सराईत...

मधल्या सीटखाली एक लोखंडी पातीचा धारदार व घातक कोयता आढळून आला. पोलिसांनी तात्काळ संशयित आरोपीस ताब्यात घेऊन बीड शहर पोलीस ठाण्यात आणले. त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली असून, त्याच्या ताब्यातून एक लोखंडी धारदार कोयता व पांढऱ्या रंगाची स्कार्पिओ गाडी जप्त करण्यात आली आहे.पोलिसांनी अधिक चौकशी केली असता,अटक करण्यात आलेला संजय बहिर हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी बीड ग्रामीण पोलीस स्टेशन, पिंपळनेर पोलीस स्टेशन व शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे खून करणे, खुनाचा प्रयत्न करणे, रात्री घरफोडी करणे, चोरी करणे अशा स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक पूजा पवार, पोलीस निरीक्षक बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक संदीप नेवरे, पोलीस अंमलदार इलियास शेख, अफसर बागवान व चालक फिरोज पठाण यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पुढील तपास पोलीस हवालदार बबन जाधव करत आहेत. बीड शहर पोलिसांच्या या तत्परतेमुळे शहरात घडू शकणारी गंभीर घटना टळली असून, संजय बहिर याचे काही तरुणांसोबत भांडण झाली होती, त्यामुळे तो त्यांना मारण्यासाठी शोधत माळवेस येथे भांडण करण्यासाठी आला असल्याची माहिती चौकशीत समोर आली आहे. नागरिकांमध्ये पोलिसांच्या कामगिरीबाबत समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

### सौ.सुनंदा जगताप...

जगताप या अतिशय शांत, संयमी व धार्मिक वृत्तीच्या होत्या. साधू-संतांच्या विचारांचा त्यांच्या जीवनावर मोठा प्रभाव होता. सामाजिक व धार्मिक उपक्रमांमध्ये त्यांचा नेहमीच सकारात्मक सहभाग राहिला. त्यांच्या पार्थिवावर आज दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता मुर्शदपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी बीड आणि मुर्शिदपूर व परिसरातील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील नेते कार्यकर्ते यांच्यासह डॉक्टर, इंजिनीयर, वकील, प्राध्यापक, शिक्षक, पत्रकार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, जावई, सून व नातवंडे असा परिवार आहे. जगताप परिवाराच्या दुःखा मध्ये सायं.दैनिक किसान परिवार सहभागी आहे.

### धनादेश न वटल्याप्रकरणी...

रक्कम फिर्यादीस परत करतेवेळी आरोपी कडाजी कडे कॅश स्वरूपात रक्कम नसल्याने त्यांनी उसनवार रकमेच्या बदल्यात फिर्यादीस रक्कम रुपये पाच लाख पन्नास हजार रुपयाचा कोटक महिंद्रा बँक शाखा जिरेवाडी,बीड चा धनादेश दिला व सदरच्या धनादेशाद्वारे रक्कम मिळून जाईल अशी हमी व भरवसा फिर्यादीस आरोपी कडाजीने दिला होता परंतु सदरचा धनादेश फिर्यादी ने त्याचे खाते असलेल्या बँकेत वटवण्यासाठी टाकला असता सदरचा धनादेश खात्यावर अपर्याप्त रक्कम (पुरेशी रक्कम) नाही या कारणाने परत आला. त्यामुळे फिर्यादीने विधिज्ञा मार्फत आरोपीस कायदेशीर नोटीस पाठऊन आरोपी कडाजीचे विरोधामध्ये बीड येथील अतिरिक्त मुख्य

न्यायदंडाधिकारी ७ वे बीड यांचे न्यायालयात समरी क्रिमिनल केस क्रमांक. १६३/२०२५ ज्ञानेश्वर विरुद्ध कडाजी असे प्रकरण दाखल केले. सदर मा.न्यायालयाने प्रकरण गुणदोषावर चालून सदर प्रकरणांमध्ये आरोपीने कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रमेंट क्ट प्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे महत्त्वपूर्ण निकाल देऊन आरोपी कडाजी ग्यानबा हुंबरे यांना सहा लाख रुपये रक्कमेचा दंड व सहा महिन्याची शिक्षा सुनावलेली आहे व दंडाची रक्कम न भरल्यास पुन्हा तीन महिने शिक्षा दिलेली आहे सदर प्रकरणामध्ये फिर्यादीचे वतीने बीड येथील प्रसिद्ध विधीज्ञ ॲड. विष्णुपंत काळे व ॲड. बप्पासाहेब वाघमोडे यांनी भक्कम बाजू मांडत काम पाहिले, त्यांना या कामी ड.लंबाटे एस.एस यांनी सहकार्य केले.

### नायब तहसीलदार प्रशांत...

आल्याने पथकाने ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही करता तहसील कार्यालयामध्ये जमा केला आहे..

सदरचा हायवाचें मालक हे ईश्वर सुखदेव राहणार म्हाळस पिंपळगाव तालुका जिल्हा बीड असल्याचे समजते.दोनच दिवसापूर्वी दिनांक १० जानेवारी रोजी पहाटे ३ वाजता प्रशांत जाधवर यानी अनिल तांदळे मंडळ अधिकारी बीड ,दादासाहेब शेळके ग्राम महसुल अधिकारी शिदोड , सचिन येरांडे ग्राम महसूल अधिकारी बीड आणि यशवंत सानप ग्राम महसूल अधिकारी साक्षालपंप्री यांना सोबत घेऊन अहेर चंचोली येथून एक विना नंबरचे न्यू हॉलंड कंपनी चें ट्रॅक्टर एक ब्रास वाळू वाहतूक करताना पकडले असून पुढील करवाईकरिता तहीसल कार्यालय येथे लावण्यात आलेले आहे. सदरचे ट्रॅक्टर हे कामराज पवळ राहणार अहेर चिंचोली तालुका जिल्हा बीड यांचे मालकीचे असल्याचे समजते.दोन्ही वाहनावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून दंडात्मक कारवाई देखील होणार आहे. सदरची कारवाई ही माननीय जिल्हाधिकारी बीड व माननीय उपविभागीय अधिकारी बीड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तहसीलदार साहेब यांच्या आदेशाने करण्यात आलेली आहे..

### फातिमा शेख यांचे ...

कार्यकर्त्या रेहाना पठाण म्हणाल्या की, फातिमा शेख यांच्या कार्यामुळे भारतीय समाज सुधारणेच्या इतिहासात मुस्लिम महिलांचे योगदान ठळकपणे अधोरेखित झाले आहे. तर प्राचार्य डॉ. ओमप्रकाश नायर म्हणाले की, फातिमा शेख यांनी आपल्या आयुष्याने हे सिद्ध केले की शिक्षण हीच सामाजिक परिवर्तनाची खरी गुरुकिल्ली आहे त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा आणि गुणांचा प्रसार करून पत्रकार वैभव स्वामी यांनी खऱ्या अर्थाने त्यांची जयंती स्तोत्र उपक्रमाने साजरी केली आहे. फौजदार राजू गुळभिले म्हणाले की, त्या काळातील कठीण परिस्थितीतही न डगमगता शेख फातिमा या शिक्षण कार्यात फुले दांपत्या सोबत खऱ्या अर्थाने कार्यरत राहिल्या. लिंगभेद, धर्मभेद न मानता सर्वांसाठी त्यांनी शिक्षणाचा आग्रह धरला. अज्ञानाविरुद्ध शिक्षण हाच मार्ग मानणारी दृष्टी त्यांनी खऱ्या अर्थाने समाजाला दिली. आज त्यांच्या जयंतीचे आयोजन बेघर निवारा केंद्रात पत्रकार वैभव स्वामी यांनी आयोजित करून खऱ्या अर्थाने आदर्शवत सामाजिक दायित्व इतरांसमोर उभे केले आहे असे मत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यवस्थापक राजू वंजारे यांनी केले तर प्रस्ताविक जिव्हाळा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य यांनी विस्तृतपणे केले. कार्यक्रमाचे आभार महिला काळजीवाहक छाया सरोदे यांनी मानले. कार्यक्रमास निराधार वंचित घटकातील लाभार्थी यासह या घटकांना न्याय मिळावा यासाठी कार्यरत असलेली मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### नगराध्यक्ष गीताभीभी पवार...

नगरपरिषद कार्यालयीन स्टाफ व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांनी स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छता मोहीम दि. ९ जानेवारी रोजी राबवत भारत सरकारने सुरू केलेल्या पाच वर्षाकरिता २०२१ मधील स्वच्छ भारत अभियान २.० स्वच्छता मोहीम मध्ये गेवराई नगरपरिषद ने आपला सहभाग नोंदवला. व नवीन बस स्थानक तसेच को भारत सरकारने पाच वर्षासाठी सुरू केलेल्या २०२१ मधील स्वच्छ भारत अभियान २.० स्वच्छता मोहीम गेवराई शहरांमध्ये नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरपरिषद कडून राबवण्यात आली यावेळी सर्व नगरसेवक व न.प. कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

### स्वामी विवेकानंद हे...

मार्गदर्शक ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी प्रा. मनीषा रेवगडे यांनी राजमाता जिजाऊ यांनी बाल शिवबावर केलेले संस्कार आणि त्यातून घडलेले शिवाजी महाराजांचे नेतृत्व स्पष्ट केले. जिजाऊंच्या संस्कारांमुळेच रयतेचे, धर्मरक्षण करणारे आणि कल्याणकारी राज्य निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात विद्यार्थिनी साक्षी सोनवणे व प्रियांका जाधव यांनी पारंपरिक वेशभूषेत राजमाता जिजाऊ यांच्या जीवनकार्यावर प्रभावी मनोगत व्यक्त केले.

### नारायणगडचे रूपडे पालटणार...

निधी उपलब्ध झालेला आहे. यामुळे राष्ट्रवादीचे आ.विजयसिंह पंडीत, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण, राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी पालकमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

### सोयाबीन, कापूस भाववाढ...

क्विंटलमागे ७० ते ८० हजार रुपयांपर्यंत नफा कमावतात, मात्र शेतकऱ्याला केवळ सुमारे ७ हजार रुपयेच दिले जातात, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. तसेच एका क्विंटल सोयाबीनपासून ७०० ते ८०० लिटर सोया दूध तयार होते. ऑनलाईन विक्री संकेतस्थळांवर सोया दुधाचा दर प्रतिलिटर सुमारे १२० रुपये असल्याने व्यापारी एका क्विंटल सोयाबीनमागे ७५ ते ८५ हजार रुपयांपर्यंत उत्पन्न मिळवतात, मात्र शेतकऱ्याला अत्यल्प दर दिला जातो, याबाबत जनजागृती करण्यात आली. या जनजागृतीनंतर शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांना भाववाढ केल्याशिवाय कापूस न देण्याचा निर्णय घेतला, तसेच सोयाबीन खरेदी केंद्रांवर माल देणे तात्पुरते थांबवले. परिणामी बाजारात कापूस व सोयाबीनचा तुटवडा निर्माण झाला. शेतमाल उपलब्ध होत नसल्याने व्यापाऱ्यांना अखेर कापूस व सोयाबीनचे दर वाढवावे लागले. शेतकरी पुत्रांच्या लढतीमध्ये शासनाने कापूस आयातीवर व्यापाऱ्यांना कर सूट थांबल्यामुळे फायदा झाला आहे.

विविध वृत्त...

दै.बीड सुपरफास्ट

गुरुवार दि. १५ जानेवारी, २०२६

३

# आधुनिक आंबेडकरी युवकांनी नितिमत्तेला जीवनमूल्य बनवावे धम्मचारी ज्ञानसंभव यांचे प्रतिपादन

**माजलगाव । प्रतिनिधी**

आधुनिक युगात तंत्रज्ञान, स्पर्धा व भौतिक आकर्षणांच्या गर्दीतून वाट काढताना आंबेडकरी युवकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारित नितिमत्तेला आपल्या जीवनाचे केंद्रबिंदू बनवावे, असे स्पष्ट मत धम्मचारी ज्ञानसंभव यांनी व्यक्त केले. त्रिरत्न बौद्ध महासंघ, माजलगाव यांच्या वतीने आयोजित एकदिवसीय युवक कार्यशाळेत ते बोलत होते. फ्लाईंग बर्डस् अकॅडमी अँड ज्युनिअर कॉलेज, माजलगाव येथे पार पडलेल्या या कार्यशाळेत रोल प्ले, विचारमंथन, चर्चासत्र आदी उपक्रमांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आधुनिक जगासाठीचे विचार प्रभावीपणे मांडण्यात आले.




कार्यशाळेसाठी धम्मचारी ज्ञानसंभव व धम्मचारी सामसिद्धी यांनी प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले. या उपक्रमास ७५ युवक - युवतींसह १५ पालकांनी उपस्थिती लावून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# ज्युनिअर महाराष्ट्र श्री २०२६ राज्यस्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धा



**बीड । प्रतिनिधी**

आय बी बी एफ महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असोसिएशन. मुंबई यांचे मान्यतेने व अहिल्या नगर असोसिएशन ऑफ बॉडी बिल्डिंग अँड फिजीक स्पोर्ट्स यांच्या विदयमाने ज्युनिअर महाराष्ट्र श्री २०२६ व ( मास्टर्स / दिव्यांग )आणि ज्युनिअर महाराष्ट्र श्री स्पर्धे चे आयोजन शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी सांयकाळी ५ वाजता विठठला लान्स राहुरी जिल्हा अहिल्या नगर येथे करण्यात आलेले आहे या स्पर्धेकरिता बीड जिल्हा ज्युनियर, मास्टर्स, दिव्यांग शरीर सौष्ठव चाचणी स्पर्धेचे आयोजन रविवार १८ जानेवारी रोजी साय: ६:३० वाजता मराठवाडा बॉडी बिल्डर्स असोसिएशन व बीड जिल्हा असोसिएशन, लाईफ हेल्थ क्लब लाईफ स्टाईल जिम महात्मा फुले शॉपिंग सेंटर,नवी भाजी मंडई बीड येथे आयोजित करण्यात आलेली आहे तरी जिल्ह्यातील इच्छुक स्पर्धकांनी सहभागी व्हावे असे आवाहन मराठवाडा बॉडी बिल्डर्स असोसिएशनचे ,कार्य अध्यक्ष आमदार विजयसिंह पंडित ( राजे ) , सचिव डॉ.सय्यद अरशियान उल्लाह मिसबाह उल्लाह, डॉ. सय्यद मसीह, शेख शफीक भाऊ, श्री.अविनाश नाईकवाडे, श्री.विक्रांत हजारे , गोरख कैवाडे , सय्यद सिराज सर ( परळी ), जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशन चे सचिव सय्यद अमान उल्लाह यांनी केले ( अधिक माहितीसाठी संपर्क करा जिल्हा बॉडी बिल्डिंग असोसिएशन सचिव सय्यद अमान उल्लाह लाईफ जिम बीड ८१४९७७७९७)

# जिल्हा परिषद शाळा गावाचा आत्मा आहे : बबनराव आंधळे

**बीड । प्रतिनिधी**

दिनांक १२.१.२०२६. गावची शाळा म्हणजे गावचा आत्मा असतो पुढील पिढ्या निकोप घडण्याचे माध्यम जिल्हा परिषद शाळा आहे पटसंख्या कमी झाल्यास सरकारी धोरणाचा हातोडा चालून गावात धडधड बंद पाडू नका शाळा गळती थांबवण्याची जिम्मेदारी सरकारची नसून समाजाची नैतिक जबाबदारी आहे दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद प्रार्थमिक शाळा बाणेगाव येथे रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, शुद्धलेखन स्पर्धा, याचे आयोजन करण्यात आले होते त्याचे बक्षीस वितरण गावचे प्रथम नागरिक सरपंच राम मोराळे सर यांच्या हस्ते करण्यात आले यांप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक बबनराव आंधळे व गावचे सरपंच राम मोराळे सर अंगद मोराळे सखाराम आंधळे राम आंधळे विष्णू आंधळे बाबासाहेब आंधळे सुधाकर आंधळे शिक्षिका सुनीता मोराळे मॅडम व दुसऱ्या शिक्षिका जनाबाई मोराळे मॅडम व विद्यार्थी उपस्थित होते प्राध्यापक बबनराव आंधळे यांच्या वाढदिवसानिमित्त या स्पर्धा आयोजित केल्या होत्या पुढे बोलताना ते म्हणाले शाळेतील मुलांचं गळतीच प्रमाण चिंतेचा विषय झालेला आहे



समाजाच्या आणि स्त्रियांच्या उद्धारासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे ओळखून मुलीच्या शिक्षणासाठी सनातनी व्यवस्थेच्या विरोधात अनेक संकटाचा सामना करत सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा पुण्यात भिडे वाड्यात सुरू केली आणि आज मुलीच्या सुरक्षेच्या कारणास्तव मुलीचे शिक्षणच अडचणीत आले आहे मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी गावातील वातावरण निर्मिती ठेवण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. बाल वयातील हिंसाचार हा चिंतेचा विषय आहे अत्याचारापासून बचाव करण्यासाठी त्रिसूत्री पाळण्याचे आवाहन करताना ते म्हणाले छे ढशश्रश्र रपव ठीप म्हणजेच पहिला मुद्दा नो म्हणजे नाही म्हणायला शिका दुसरा मुद्दा ढशश्रश्र आपल्या सोबतच घडलेली घटना आई-वडिलांना शिक्षकांना किंवा आपल्या विश्वासातील व्यक्तींना सांगा आणि मुद्दा क्रमांक तीन ठीप जर का तुम्हाला अशी परिस्थिती जाणवते की ज्या परिस्थितीमध्ये तुम्ही सुरक्षित नाहीत किंवा कोणी तुमच्याकडे विचित्र नजरेने किंवा विचित्र पद्धतीने वागतोय अशा ठिकाणी तुम्ही थांबायचं नाही त्या ठिकाणाहून तुम्ही लगेच निघून जायचं अशा पद्धतीने त्रिसूत्री सांगून चांगला आणि वाईट स्पर्श याविषयी विद्यार्थ्यांना सज्ज करण्यात आले. समाजप्रबोधनाचे विचार मांडण्यात आले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेच्या मुख्याध्यापक सुनीताताई मोराळे यांनी केले व कार्यक्रमाची सांगता झाली.



**पाटोदा – तालुक्यातील हुतात्मा देवराव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, भायाळा येथे राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बागडे सर यांनी अत्यंत प्रभावी पद्धतीने केले. यावेळी बोलताना बागडे सरांनी जिजाऊ माँसाहेबांनी शिवरायांना कसे घडवले आणि त्यांना बालपणापासूनच स्वराज्याचे धडे देऊन एक थोर राजा म्हणून कसे तयार केले, याचे सविस्तर वर्णन केले. तसेच त्यांनी स्वामी विवेकानंद यांच्या महान कार्यावरही प्रकाश टाकला. ज्येष्ठ शिक्षक बी. बी. नागरगोजे सर यांनी आपल्या मनोगतातून राष्ट्रमाता जिजाऊंच्या जीवनकार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली.**




**नांदेड येथे आयोजित राज्यस्तरीय थायबॉक्सिंग स्पर्धा दिनांक १० व ११ जानेवारी रोजी यशस्वीरित्या पार पडल्या. या स्पर्धेत राज्यातील तब्बल २१ जिल्ह्यांमधून २५० पेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. बीड जिल्ह्यातील १३ खेळाडूंनी सहभाग नोंदवून सर्वांनी पदक जिंकत जिल्ह्याचा गौरव वाढवला. बीड जिल्ह्यातील विजेते खेळाडू असे. १) राठोड रितेश रमेश (सुवर्णपदक) २) शेख आदिल तैमूर (सुवर्णपदक) ३) शेख आमेर (सुवर्णपदक) ४) वलीद काजी (सुवर्णपदक) ५) आमेर पठाण (सुवर्णपदक) ६) मोआझ बसद (सुवर्णपदक) ७) शिवाजी कुरुंद (सुवर्णपदक) ८) इंशरा खान (सुवर्णपदक) ९) तोहीद शेख(सुवर्णपदक) १०) रेहान पठाण (सुवर्णपदक) ११) कामरान शेख (सुवर्णपदक) १२) आभार पठाण (सुवर्णपदक) १३) रबी शेख (प्रो टायटल बेल्ट विजेता).**



**बीड – शिक्षण महर्षी डॉक्टर बापूजी साळुंखे हायस्कूल,बीड मध्ये भारतीय संस्कृतीचे महान प्रचारक स्वामी विवेकानंद आणि स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ यांची संयुक्त जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून प्रशाळेत 'युवा सप्ताह' व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात प्रशाळेचे ज्येष्ठ शिक्षक मुंडे ए एच सर यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी महापुरुषांना अभिवादन केले.**



**राजमाता राष्ट्रमाता माँ साहेब जिजाऊ जयंतीच्या निमित्ताने विनम्र अभिवादन करताना सामाजिक कार्यकर्ते तथा युवा नेते अशोक दादा ढोले पाटील, दत्ता जगताप, प्रकाश तावरे,विकास मुळे, दत्तात्रय सोनवने,गौरव सोनवणे सह आदी दिसत आहेत**



**डॉ.जितीन वंजारे यांची पुतणी आश्लेषा प्रमोद वंजारे व भाचा वैभव अरुण औसरमल यांच्या मंगल परिणय समई माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, बीजेपी नेते योगेश क्षीरसागर,बीजेपी नेते वाल्मितात्या निकाळजे, मा.सभापती नारायण परजने,रिपाई नेते पप्पूजी कागदे,अर्जुनदादा बहिरवाळ,रापम नेते बबनराव वडमारे ,नगरसेवक दीपक निकाळजे, नगरसेवक प्रमोद शिंदे,नगरसेवक अरुण निकाळजे,विजय सरपते, संतोष वंजारे,भाऊसाहेब औसरमल, भीमा सरपते,बंडू सोनवणे,इत्यादी सह अनेक मान्यवर उपस्थित होते.**



**दिनांक, १२ जानेवारी २०२६ आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित, बोरखेड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राजमाता, राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक जोगदंड सर यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे श्री शाहूराजे भोसले, श्री आनपट नाना, श्री सोमीनाथ आनपट यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. मान्यवरांच्या शुभहस्ते राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या पावन प्रतिमांचे पूजन संपन्न झाले.**



**दिनांक, १२ जानेवारी २०२६ आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित, साक्षाळ पिंपरी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राजमाता, राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री येवले सर यांच्या अध्यक्षतेखाली यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. मान्यवरांच्या शुभहस्ते राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या पावन प्रतिमांचे पूजन संपन्न झाले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य श्री येवले सर यांनी राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ यांचे कार्य तसेच स्वामी विवेकानंद यांचे कार्य याविषयी सर्वांना सखोल मार्गदर्शन केले. व सर्वांना जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.**

# संत रविदास महाराज जयंती अध्यक्षपदी हरिभाऊ सवणे यांची निवड



**माजलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रीय चर्मकार महासंघ ता.शाखा माजलगाव महत्त्वपूर्ण बैठक रविवार दि. ११ रोजी दुपारी २:०० वा. रविदास छत्रपती संभाजी महाराज चौक माजलगाव येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीत सर्वानुमते संत रविदास महाराज व वीर कंकया महाराज जयंती माजलगाव अध्यक्षपदी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांची एकमताने निवड झाली. जयंती सचिव मयूर वाघमारे, कोषाध्यक्ष रमेश जगताप, उपाध्यक्ष राधाकिसन भाळशंकर यांची यावेळी निवड करण्यात आली. या बैठकीसाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे कर्मचारी माजी जिल्हाध्यक्ष अशोक वाडेकर, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष गणेश गवळी, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे माजी कार्याध्यक्ष सत्यनारायण उनवणे, वडवणी तालुका अध्यक्ष मधुकर ठोसर,पद्माकर कांबळे, नितीन कांबळे, प्रकाश आगवणे, सचिन वाघमारे, भगवान सोनवणे, प्रसाद वाघमोडे, संतोष पोहेकर, रणवीर काबला, अशोक सोनटक्के, विजय नरहिर, अशोक भालशंकर, विकास गायकवाड यांच्यासह अनेक समाज बांधवांची उपस्थिती होती.

# नांदेड राष्ट्रीय थाइबॉक्सिंग चॅम्पियनशिप, आर जी एफ बीड टीम ने पटकावले १३ मेडल



**नांदेड । प्रतिनिधी**

लोकमत प्रायोजित नांदेड इनडोअर स्टेडियम येथे महाराष्ट्र राज्य थायबॉक्सिंग असोसिएशन चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत टीम आरजीएफ चे १३ फायटर्सनी बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. मुख्य प्रशिक्षक मोहम्मद रबी शेख आणि वरिष्ठ प्रशिक्षक मोहसीन सर यांच्या कठोर प्रशिक्षणाखाली. टीम आरजीएफमधील सर्वोत्तम फायटर्सपैकी एक अबरार खान मुसा खानने ८५ किलो हेवीवेट प्रकारात नॉकआउट विजय मिळवला आणि पीआरओ फाईटमध्ये हेड कोच मोहम्मद रबी शेखने स्प्लिट डिसिजनने टायटल बेल्ट जिंकला आणि २१,१९,१७,१४ वर्षांखालील गटात दुसऱ्या फायटरने सुवर्णपदके आणि ट्रॉफी जिंकल्या. १) आदिल तैमूर.२) शेख आमेर ३) वलीद काझी ४) ओमर सिराज पठाण ५) मोआज बसद६) शिवराज कुरुंद ७) रितेश ८) इंशरा खान ९) तोहीद १०) रिहान पठाण ११) शेख कामरान बीड जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य चॅम्पियन्सना त्यांच्या कठोर परिश्रम आणि कामगिरीबद्दल हे चांगला यश मिळाला आहे. आर जी एफ बीड चे रबी आणि मोहसीन सरांनी सर्व पदक धारकांना शुभेच्छा व्यक्त केली.

# पाडळी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**पाडळी । प्रतिनिधी**

दर वर्षी राष्ट्र संत वैराग्य मुर्ती संत भगवान बाबा, वैकुंठवासी थोर संत वामन भाऊ महाराज तसेच वैकुंठवासी संत भिमसेन महाराज भगवान गडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त न्यायाचार्य नामदेव



शास्त्री यांच्या प्रेरणेने,ह.भ.प.पांडुरंग महाराज गुरु रामदास महाराज डोंगरेश्वर संस्थान करंजवण यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक १३/०१/२०२६ते२०/०१/२०२६या कालावधी मध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले असून सर्व भाविक भक्तांनी हरिनाम सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन पाडळी (लालाची) यांनी केले आहे. याबाबत सविस्तर माहिती असी की, ही अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा गेल्या बावीस वर्षांपासून सुरू असून या वर्षी देखील महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध किर्तनकार आपली किर्तन रुपी सेवा देणार आहेत.ह.भ.प.अतुलमहाराज शास्त्री तागडगाव, राधाबाई महाराज सानप ,आई मिराबाई संस्थान महासांगवी, दयानंद जी महाराज कोरेगावकर, बाळासाहेब महाराज शिंदे, अक्षय महाराज पिंगळे, तुकाराम मुंडे शास्त्री, कृष्णा महाराज शास्त्री आणि पांडूरंग महाराज शास्त्री यांची किर्तन रुपी सेवा मिळणार मिळणार असल्याने भजन कीर्तन प्रवचन आणि अन्नदान व समाजप्रबोधनाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन पाडळी लालाची, तालुका शिरूर कासार यांनी केले आहे.

# विशेष मकर संक्रांत सना निमित्त जरूड चे जलदूत राजेश काकडे यांच्यावतीने माता भगिनींना किरणा किटचे वाटप



**बीड । प्रतिनिधी**

दिनांक ११ जानेवारी रोजी जरूड गावचे भूमिपुत्र जलदूत राजेश काकडे या अवलियाने समस्त गावातील माता भगिनींना किराणा किट वाटपचे आयोजन केले होते या कार्यक्रमात विशेष उपस्थिती पिंपळनेर पोलीस स्टेशन चे ए पी आय मधुसूदन घुगे साहेब, बीडचे सामाजिक कार्यकर्ते अशोक दादा ढोले पाटील, दिव्यांग कर्मचारी संघटना प्रदेशाध्यक्ष उपाध्यक्ष अशोक आठवले साहेब,गावातील सरपंच श्रीराम काकडे उपसरपंच पंजाब दादा काकडे ग्रामपंचायत सदस्य सुरेश काकडे पत्रकार जालिंदर काकडे शाम काकडे अमोल काकडे विलास काकडे विनोद काकडे दीपक काकडे ज्ञानेश्वर काकडे किशोर काकडे जेष्ठ नेते भाऊ सुरवसे,करणं बोरगे ,व गावातील ज्येष्ठ नागरिक,सह आदी मान्यवर उपस्थित किराणा किटचे वाटप केले, व या कार्याबद्दल पिंपळनेर ची पी आय घुगे साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मनाले आजच्या युवकांनी राजेश काकडे यांचा आदर्श घेऊन वाढदिवस पुण्यतिथी आदी सणा निमित्त असेच गोरगरिबांना जे आपल्या परीने दान होईल ते आयोजन करावे विशेष कवतुक केले व सर्व मान्यवरांनी राजेश काकडे यांचे कवतुक केले.

# २८ वर्षानंतर विद्यार्थी आले एकत्रित

# सबदरअली देशमुख राष्ट्रिय विद्यालय पेंडगाव येथे स्नेहसंमेलन सोहळा



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पेंडगाव येथेल सबदरअली देशमुख राष्ट्रीय विद्यालयातील १९९७-९८ च्या १०वी बॅचच्या विद्यार्थ्यांनी एकत्रित येत स्नेहमिलन सोहळा आयोजित केला होता. हा सोहळा काल पार पडला. या सोहळ्याला शिक्षकांचीही उपस्थिती होती. सबदरअली देशमुख राष्ट्रीय विद्यालयात पेंडगाव येथेल शिक्षण घेणार्या १९९७-९८ च्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी स्नेहमिलन सोहळा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. हा सोहळा काल उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्याध्यापक ए.जे. राऊत, एस.एस. काळे, एस.जी. शिंदे, के.डी. पुराणीक, एस.एस.धारकर, तसेच प्रमुख उपस्थिती शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती येवले मॅडम, कोकाटे, गाडे, एन.बी. जावळेकर यांच्यासह आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली गणेश घनवट यांनी केले. तसेच कार्यक्रमाचा प्रस्ताविक सुखदेव धट व अनुमोदक एजाज शेख यांनी केले या दरम्यान या कार्यक्रमात माजी विद्यार्थी प्राध्यापक मिर्झा आसेफ बेग मौलाना आझाद अल्पसंख्याक कालेज संभाजीनगर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन मुसा बेग, गणेश घनवट, सुखदेव धट, शेख एजाज, जाहेर बेग, वसीम बेग, भागवत खुळे, समशेर बेग, गिता मेहंद्रकर, सविता गाडे यांनी केले होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सुवर्णा मोरे यांनी मानले. दरम्यान खेळीमेळीच्या आणि उत्साहाच्या वातावरणात हा स्नेहसंमेलन मेळावा संपन्न झाला. दरम्यान यावेळी शिवशंकर जगले, गणेश घनवट, गोकूळ ढास, सुनिल हाडूळे, अजीम बेग, बाबासाहेब परदेशी, सुनिल उगले, रमेश काळकुटे, बाबु पुर्भे, शेख लतीफ, गणेश परदेशी, मोजम बेग, रामदास धट, मुजीब बेग,एजाज शेख, राजेंद्र हाडूळे, चांगदेव गिरी, परवीण शेख, ममता परदेशी, चंदा परदेशी, रंजना पडूळे, समीना बेग, गिता महिंद्रकर, सविता गाडे यांची उपस्थिती होती.

# सत्ता–धारी

**काय सत्ता अन ती खुर्ची**
**सोबती नेणार काय**
**निष्ठा टांगून वेशीला**
**सुखनिद्रा मिळणार काय**
**मुखवट्याच्या आड तो**
**बिनधास्तपणे वावरतो**
**नोटांच्या जोरावरती**
**कठपुतळ्यांना नाचवतो**
**विषय सोडून विकासाचा**
**खेकड्यापरी खेचाखेची**
**वैयक्तिक मामले तुमचे**
**घाई चव्हाट्यावर आणायची**
**स्मृतिभ्रंश झालाय बहुदा**
**या पांढऱ्या बगळ्यांना**
**पूर्वजांना सोडाच हो पण**
**विसरलेत आश्रयदात्यांना**
**नजर लागली महाराष्ट्राच्या**
**धुरंदर त्या राजनीतीला**
**लहान –मोठा,आदर सत्कार**
**जणू चुना लावला संस्कृतीला**
**राजकारणाच्या भट्टीला**
**गोरगरिबांचे होते सरपण**
**सग्यासोयऱ्याचा ढेकर अन**
**श्रीमतांचे आहे पोटभर जेवण**
**मीडिया आपली गरीबगाय**
**चारा मिळताच दुध देते**
**खरे बोलण्याची करता हिम्मत**
**लायसन त्यांचे गायब होते**
**झेंड्याझेंड्याच्या शर्यतीत**
**तिरंगा राहतो पाठीच आता**
**शपथविधीचा सोहळा**
**आठवून रडते पहा भारतमाता**

**आम्रपाली घाडगे (आमु)**

# श्रीराम जन्मभुमी निर्माण प्रण प्रतिष्ठा निमित्त रामायण बालकांड वाचन सोहळ्याचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

आयोध्यानगरी येथील ऐतिहासीक श्रीराम जन्म भुमी निर्माण सोहळा करण्यासाठी आम्ही राम कथा बीड शहरातील बार्शी नाका दुधडेअरी समोर कातागळे नगर येथे दि. १३.०१.२०२६ रोजी मंगळवार या रोजी रामायनातील बालकांड याची सुरुवात करीत आहोत. ८ ते १० दररोज एक अध्याय होईल सोहळ्या निमित्ताने या रामायणाला प्रेरणा देणारे ह.भ.प. वाचक भागवत महाराज राकुसले, ह.भ.प. जगदाळे महाराज वाचक म्हणून राहतील सदगुरु दास सेवाधारी म्हणुन विनायक गव्हाणे म. व बीड मध्ये सर्व राम भक्त सेवा करतील. कथेचे आयोजन जालिंदर चिलाजी कातंगळे व समस्त कातंगळे परिवार कथा प्रारंभदि. १३.०१.२०२६ मंगळवार रोजी होईल. वाचक सुचक पनाळकर महाराज, काकडे महाराज, फिरंगे महाराज, विशाल कातांगळे, जाधवबाई, गाडेबाई, जगतापबाई व सर्व रामायनाचार्य बीड कथेची सांगता दि. २२.०१.२०२६ गुरुवार रोजी समाप्ती होईल. होईल. कथा सकाळी ११.०० चालु होईल व दुपारी ०२.०० वाजता प्रसादाला सुरुवात स्थळ :- बार्शी नाका, शासकीय दुध डेअरी समोर कातांगळे नगर बीड तरी सर्व राम भक्ताने येऊन शोभा वाढवावी, ही नम्र विनंती.

# शांताई अर्बनमध्ये जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

समाजप्रबोधन व राष्ट्रनिर्मितीचे विचार रुजवणाऱ्या राजमाता जिजाऊ व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त शांताई अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., बीड येथे उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे गणेश चव्हाण व योगेश शिंदे यांच्या हस्ते पूजन करून करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. डी. बी. शिंदे यांनी स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर सखोल मार्गदर्शन करताना, स्वतःवर विश्वास ठेवून प्रामाणिकपणे कार्य केल्यास कोणतेही ध्येय साध्य



होऊ शकते. विवेकानंदांचे विचार आचरणात आणल्यास व्यक्ती व संस्था दोन्ही प्रगती करू शकतात, असे प्रतिपादन केले. यावेळी बँकेच्या कार्यपद्धती, विश्वासार्हता व समाजाभिमुख वाटचालीबाबत बँकेचे वर्णन करण्यात आले. तसेच संदीप वाघमारे सर यांनीही उपस्थितांना स्वतःच्या अनुभवातून मार्गदर्शन व प्रेरणादायी उपदेश केला. त्यांच्या विचारांनी उपस्थितांना सकारात्मक दृष्टीकोन मिळाला. यानंतर प्रमुख अतिथींचा सत्कार करण्यात आला. सर्व उपस्थितांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.



घाटनांदूर – शैक्षणिक गुणवत्तेचे केंद्र श्री शंकर विद्यालय घाटनांदूर या शैक्षणिक संकूलातील गुणवंत विद्यार्थीनी कु. स्नेहल त्र्यंबक गित्ते हिने व्हिजन कोचिंग क्लासेस, अंबाजोगाई मार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धात्मक परीक्षेत अंबाजोगाई , केज , परळी या तीनही तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला त्याबद्दल कु स्नेहल गित्तेचा सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.श्री.सचिन देशमुख(विज्ञान विभागप्रमुख टिळक विद्यापीठ पुणे) यांच्या हस्ते लॅपटॉप,सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन करण्यात आला.तिच्या या यशाबद्दल संस्थाध्यक्ष श्री पंडीतराव दौंड, संस्थासचिव संजयभाऊ दौंड,मु.अ. गित्ते व्हि.एल,पर्यवेक्षक दौंड व्ही.एम , सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी , पालकवर्ग यांनी अभिनंदन केले आहे.

# नारायणगडचे रूपडे पालटणार; विकासासाठी ९ कोटी ९० लाखांचा निधी मंजूर

## आ.विजयसिंह पंडित, ॲड.चव्हाण, बळीराम गवते यांनी मानले पालकमंत्री अजित पवार यांचे आभार







**बीड । प्रतिनिधी**

धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायणगड, या तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने तब्बल ९ कोटी ९० लाख ६० हजार रुपयांचा निधी मंजूर करून तो जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे वितरित केला आहे. ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी हा निधी देण्यात आला आहे. या निर्यणाबद्दल आ.विजयसिंह पंडित, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण, गडाचे विश्वस्त तथा राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांनी पालकमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

नारायणगड तीर्थक्षेत्रासाठी यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या विकास आराखड्याची एकूण किंमत २५ कोटी रुपये इतकी असून, त्यास शासनाने टप्प्याटप्प्याने प्रशासकीय मान्यता दिली आहे. याआधीच विविध शासन निर्णयांद्वारे ७ कोटी ४१ लाख रुपयांचा निधी वितरित करण्यात

आला होता. दरम्यान, उर्वरित निधी मिळावा, यासाठी आ.विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखली आणि राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांच्या साथीने राष्ट्रवादीचे युवक जिल्हाध्यक्ष तथा नारायण गडचे विश्वस्त बळीराम गवते यांनी विकास कामांचा आराखडा तयार करून शासनाकडे सादर करण्यासाठी प्रयत्न केलेले आहे. या प्रयत्नांना आता यश मिळाले असून शासनाने ९ कोटी ९० लाख ६० हजार रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.आता नव्याने मंजूर करण्यात आलेल्या निधीमुळे विकासकामांना अधिक गती मिळणार आहे. राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत श्री क्षेत्र नारायणगड येथील विकास आराखड्यातील मंजूर कामांसाठी सदर निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.या निधीचा वापर केवळ प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांसाठीच करण्यात यावा, असे शासनाने स्पष्ट निर्देश दिले आहेत. तसेच कामांची गुणवत्ता, वेळेत पूर्तता व निधीचा योग्य वापर याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी विशेष दक्षता घ्यावी, अशा सूचनाही शासन निर्णयात नमूद करण्यात आल्या आहेत.नारायणगड तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी मंजूर झालेल्या या मोठ्या निधीमुळे भाविकांसाठी मूलभूत सुविधा, पायाभूत सोयी-सुविधा व पर्यटन विकासाला चालना मिळणार असून, परिसराच्या सामाजिक व आर्थिक विकासाला मोठा हातभार लागणार आहे. पालकमंत्री अजित पवार यांच्यामुळे हा

» पान २ वर

## नगराध्यक्ष गीताभीभी पवार यांच्या उपस्थितीत स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छता मोहीम




**गेवराई । प्रतिनिधी**

स्वच्छ गेवराई सुदंर गेवराईचे जनक आदरणीय बाळराजे दादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराईकरांनी चौथ्यांदा नगरपरिषद भाजपाच्या ताब्यात दिली आहे तरी स्वच्छतेसाठी नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ. गिताभाभी पवार यांनी केले आहे भारत सरकारने पाच वर्षासाठी सुरू केलेल्या २०२१ मधील स्वच्छ भारत अभियान २.० स्वच्छता मोहीम गेवराई शहरांमध्ये नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नगरपरिषद कडून राबवण्यात आली. शहरांमधील नवीन बसस्थानक व कोर्ट परिसरामध्ये नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ गीताभाभी बाळराजे पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व सर्व सन्माननीय नगरसेवक,

» पान २ वर

## स्वामी विवेकानंद हे आजच्या तरुणांच्या मनातील धगधगणारी चेतना : तेलप



**चौसाळा । प्रतिनिधी**

चौसाळा (ता. बीड) येथील कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय युवक दिनानिमित्त राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती राष्ट्रीय सेवा योजना व महिला कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पंडित खाकरे सर होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. सुधीर तेलप , प्रा. मनीषा रेवगडे उपस्थित होते. यावेळी पदवीत्तर संचालक डॉ. सुधाकर वणवे, प्रा. गणपती धवळशंख, डॉ. अमर आलदे, डॉ. सय्यद शाहीन आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. सुधीर तेलप म्हणाले की, स्वामी विवेकानंद हे केवळ इतिहासातील महापुरुष नसून आजच्या तरुणांच्या मनातील धगधगणारी चेतना आहेत. शिकागो येथील धर्मपरिषदेत दिलेले त्यांचे भाषण हे भारताच्या आत्मगौरवाचे जागतिक घोषवाक्य ठरले. मानव सेवा हीच ईश्वर सेवा हा त्यांनी दिलेला संदेश आजच्या सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनाला दिशा देणारा आहे. स्वामी विवेकानंदांनी तरुणांमध्ये निर्भयता, आत्मविश्वास, राष्ट्रभक्ती आणि समाजाभिमुखतेचे बीज रोवले. बदलत्या काळातही त्यांचे विचार कालबाह्य न होता अधिक तेजस्वीपणे उजळून निघत आहेत. आत्मनिर्भर भारताच्या उभारणीत विवेकानंदांचे विचार दीपस्तंभासारखे

» पान २ वर

## राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत नायगाव चा ओमेर पठाण प्रथम




**नांदेड । प्रतिनिधी**

येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत नायगावचे भूमिपुत्र ओमेर सिराज पठाण यांनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला असून त्यांनी गोल्ड मेडल मिळवले आहे. ओमेर पठाण यांच्या या दैदीप्यमान यशामुळे नायगाव सह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण आहे. कठोर सराव, शिस्तबद्ध जीवनशैली आणि जिद्दीच्या जोरावर ओमेर यांनी ही कामगिरी साध्य केली.खेळात सातत्य ठेवल्याने हे यश मिळाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल क्रीडाप्रेमी, नागरिक, मित्रपरिवार व विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरही ओमेर पठाण यांनी नायगावचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा सर्वत्र व्यक्त होत आहेत.

## ११ व्या आंतरराष्ट्रीय सुरताल संगीत महोत्सवात श्रीमती राधा तांबे योगाचार्य पुरस्काराने सन्मानित



**करमाळा । प्रतिनिधी**

येथील सुरताल संगीत विद्यालयाच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त ११ वा आंतरराष्ट्रीय सुरताल संगीत महोत्सव १० जानेवारी रोजी गुरु प्रसाद मंगल कार्यालय येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. बाळासाहेब नरारे व यश कल्याणी सेवाभावी संस्था यांच्यावतीने श्री. गणेश करे यांनी केले होते.या प्रसंगी देशभरातून नामवंत संगीत, नृत्य क्षेत्रातील कलाकार तसेच अनेक रसिक उपस्थित होते. महोत्सवातील उल्लेखनीय क्षण म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तुंग कामगिरी करणाऱ्या श्रीमती डॉ. राधा सचिन तांबे (घोलप) यांना आंतरराष्ट्रीय योगाचार्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.डॉ. राधा तांबे यांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर योगविद्या समाजाच्या हितासाठी पोहोचवण्यात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत सुरताल संगीत महोत्सवात त्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

## खुनाच्या गुन्ह्यात ६ वर्षांपासून फरार आरोपी अखेर ताब्यात

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या खुनाच्या गुन्ह्यात मागील सहा वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला अखेर पोलिसांनी अटक केली आहे. सुगावा लागताच आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित गुन्हा घडला तेव्हा आरोपी बालक असल्याने या विधीसंघर्ष बालकास बाल न्याय मंडळासमोर करण्यात आले होते. जिल्ह्यातील वॉन्टेड आरोपींचा शोध घेण्याचे आदेश पोलीस अधीक्षक नवनीत कावंत यांनी दिले असता त्या अनुषंगाने गेवराई पोलीस ठाणे हद्दीत वॉन्टेड आरोपींचा शोध सुरू असताना या आरोपीबाबत माहिती मिळाली.पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने कारवाई करत आरोपीच्या घराजवळ सापळा लावला. दरम्यान पोलिसांचा सुगावा लागताच आरोपीने घरातून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी जवळपास एक किलोमीटरपर्यंत पाठलाग करून त्याला पकडले.

सदर आरोपीविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ३४७/२०१९ अन्वये भादंवि कलम ३०२, १२०(ब), १४३, १४७, १४८, १४९ अंतर्गत गुन्हा दाखल आहे. आरोपीला ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू असून या गुन्ह्याचा तपास उपनिरीक्षक संजय उदगीरकर करत आहेत.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावंत ,अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपअधीक्षक अनिल कटके, मार्गदर्शनाखाली स पो नी संतोष जंजाळ, ग्रेड पे ऊ. प. नी. श्रीमंत उबाळे पो . हे. कल्याण राठोड पो.का. रामराज काकडे, गोरक्ष डोके, यांनी केली.

## फातिमा शेख यांचे कार्य स्त्रीशिक्षण, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाचे प्रतीक आहे - नगरसेवक शेख रईस

### जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात पत्रकार संघाच्या वतीने फातिमा शेख यांची जयंती साजरी



**बीड । प्रतिनिधी**

त्या काळात दलित,वंचित, मुस्लिम समाजातील स्त्रियांना शिक्षणाची द्वारे उघडी नव्हती. महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून फातिमा शेख यांनी शिक्षणाची धुरा पुढे नेली. सामाजिक बहिष्कार, अपमान आणि धमक्यांना तोंड देत त्यांनी सुरू केलेले शिक्षणाचे कार्य कायम ठेवले. यामुळेच खऱ्या अर्थाने स्त्रीशिक्षण, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक न्यायाचे खरे प्रती म्हणजे फातिमा शेख होय. पडद्यामागे असलेल्या फातिमा शेख यांची जयंती पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात खऱ्या वंचितामध्ये साजरी करून त्यांच्या विचारांना खऱ्या अर्थाने न्याय दिला आहे असे प्रतिपादन नवनिर्वाचित नगरसेवक शेख रईस यांनी जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

बीड येथील जिव्हाळा बेघर निवारा केंद्र येथील निराधार,वंचित घटकांसमवेत अल्पसंख्याक समाजातील पहिल्या महिला स्त्री शिक्षिका फातिमा शेख यांची जयंती ९ जानेवारी रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि दैनिक समर्थ राजयोग यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे आयोजक पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख तथा संपादक वैभव स्वामी यांच्यासह फौजदार राजू गुळभिले,नगरसेवक शेख रईस, निराधार,विधवा, वंचित, निरक्षर महिलांना न्याय देण्यासाठी तत्पर असलेल्या सामाजिक कार्यकर्त्या रेहाना पठाण यांच्यासह आम्रपाली साबळे, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. ओमप्रकाश नायर, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता गोपाळ नाईक, एसटी महामंडळातील सेवानिवृत्त बाबासाहेब जाधव, महारुद्र मोराळे, लक्ष्मणराव वंजारे, राजकुमार कागदे जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, मुख्य व्यवस्थापक राजू वंजारे, महिला काळजीवाहक छायाताई सरोदे यांच्यासह मान्यवर मंडळी उपस्थित होती. याप्रसंगी सामाजिक

» पान २ वर

## करियर संसदेच्या पाच दिवसीय अधिवेशनात मिल्लीया महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**बीड । प्रतिनिधी**

बारामती येथील शारदाबाई पवार महिला महाविद्यालयात करियर संसदेचे पाच दिवसीय अधिवेशन उत्साहात पार पडले. या अधिवेशनात मिल्लीया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवत आपल्या करियरविषयक संधी, आव्हाने व भविष्यातील उद्दिष्टांवर प्रभावी मांडणी केली. या अधिवेशनात विविध सत्रांद्वारे करियर मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा, उद्योजकता, नेतृत्वगुण विकास, तसेच उच्च शिक्षणाच्या संधी यावर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तर सत्रात सक्रिय सहभाग घेत आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. कार्यक्रमादरम्यान वक्त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, निर्णयक्षमता व कौशल्यविकासाचे महत्त्व पटवून दिले. करियर संसदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडण्याची संधी मिळाल्याने त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत झाली असे मत आयोजकांनी व्यक्त केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील यांनी उपक्रमाचे कौतुक करत अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते असे सांगितले. अधिवेशनाचा समारोप प्रेरणादायी संदेशाने करण्यात आला. या अधिवेशनात विद्यार्थी शेख जशनैन , खान जव्वाद अली, शेख साद, अरब अबुद यांनी सहभाग घेतला तसेच महाविद्यालय समन्वयक म्हणून डॉ. शेख हुसेन इमाम यांनी काम पाहिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजील व करिअर कट्टयाचे समन्वयक डॉ.मोहम्मद आसेफ इकबाल यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक बीड सुपरफास्ट हे पत्र मुद्रक बालाजी मारुती खैरमोडे यांनी प्रकाशक व मालक अतुल शंकरराव जाधव यांच्यासाठी बालाजी प्रिंटर्स ॲण्ड पब्लीकेशन, हनुमान नगर, अंबाजोगाई, जि. बीड, ४३१५१७ (महाराष्ट्र राज्य) येथून छापून, दैनिक बीड सुपरफास्ट कार्यालय, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. ४१, मोहन टॉकीजसमोर, परळी रोड, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड ४३१५२३ (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. संपादकः अतुल शंकरराव जाधव

Printed By BALAJI MARUTI KHAIRMODE and published by ATUL SHANKARRAO JADHAV on behalf of DAILY BEED SUPERFAST (Name of Owner) ATUL SHANKARRAO JADHAV and printed at BALAJI PRINTERS AND PUBLICATION HANUMAN NAGAR AMBAJOGAI TALUKA AMBAJOGAI DISTRICT BEED 431517 (MAHARASHTRA STATE) (place of printing) and Published at AMBAJOGAI DISTRICT BEED (MAHARASHTRA STATE) (place of publication) 'BEED SUPERFAST' OFFICE: NAGAR PALIKA SHOPPING COMPLEX, BLOCK NO 41, FRONT OF MOHAN TAAKIES, PARLI ROAD, AMBAJOGAI, TALUKA AMBAJOGAI, DISTRICT BEED, PIN-431517 (MAHARASHTRA STATE) editor ATUL SHANKARRAO JADHAV